ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख २ जुलै, १९५८ | अंक १७

## विविध माहिती

**मुक्या उपग्रहाचा वेध**—अमेरिकेच्या संरक्षण खात्यानें अमेरिकेच्या भूमीवरून भ्रमण करणाऱ्या व ध्वनि न करणाऱ्या कृत्रिम उपग्रहाचाहि वेध घेण्यासाठी रेडरचें जाळें पसरण्याचें ठरविलें आहे. त्याच्या साह्यानें अमेरिकन प्रदेशावरून जाणाऱ्या कोठल्याहि उपग्रहाची कक्षा व गति ह्यासंबंधीं अचूक माहिती मिळूं शकेल. उपग्रहांना लष्करी महत्त्व असावें, असा अंदाज ह्यावरून करण्यांत येत आहे.

**सायकलींच्या साखळयांचा कारखाना**—सायकलींना लागणाऱ्या साखळया निर्माण करण्याचा एक कारखाना भावनगर येथें लवकरच उभारण्यांत येणार आहे. कारखान्यांत दरसाल १·५ लाख साखळया तयार करण्यांत येतील. यथाक्रम कारखान्याचा विस्तार करण्यांत येऊन, दरसाल ४·५ लाख साखळया उत्पन्न करण्यांत येतील.

**आदिवासींची पुनर्वसाहत**—भडोच जिल्ह्यांतील ज्या आदिवासींची जमीन कूळकायद्यामुळें गेली असेल त्यांची पुनर्वसाहत करण्याची योजना मुंबई सरकारनें आखली आहे. योजनेप्रमाणें आदिवासी कुटुंबांना कसण्यास नवी जमीन देण्यांत येणार असून त्यांच्या रहाण्याचीहि सोय करण्यांत येणार आहे. योजनेचा खर्च १ लाख रु. आहे.

**केरळ राज्यांतील पगार**—केरळ राज्यानें नेमलेल्या पगारमंडळाच्या शिफारसी सरकार अंमलांत आणणार आहे. ह्या शिफारसीप्रमाणें राज्यांतील सगळयांत कनिष्ठ श्रेणीच्या चपराशाला ६० रुपये पगार मिळेल. जास्तींत जास्त पगार दरमहा १,००० रुपये असेल. फक्त एक्झिक्युटिव्ह एंजिनिअर व डायरेक्टर ऑफ हेल्थ सर्व्हिस ह्यांना मात्र १,२०० रुपये मिळतील.

**हिंवतापाविरुद्ध मोहीम**—केरळ राज्यांतील हिंवतापाचें निर्मूलन करण्यासाठी सरकारनें ३ वर्षें मुदतीची एक योजना आखली आहे. तिच्या अंमलबजावणीसाठी एकूण ६१·५ लाख रुपये खर्च येणार आहे. त्यांपैकी २५·४ लाख रुपये मध्यवर्ती सरकार देणार असून बाकी रक्कम राज्य सरकार देणार आहे.

**रूरकेला येथील पोलादाचा कारखाना**—रूरकेला येथें उभारण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्याचें काम आखणीप्रमाणें चालू आहे. ह्याच गतीनें काम चालू राहिल्यास चालू वर्षअखेर कारखान्यांतील पहिली भट्टी प्रत्यक्ष उत्पादन करूं लागेल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**आंब्याच्या करंडींत ५०,००० रुपये**—कलकत्ता येथील जकात अधिकाऱ्यांनीं आंब्याच्या करंडींत दडवून ठेवलेल्या ५०,००० रुपयांच्या नोटा पकडल्या आहेत. ही करंडी स्वित्झरलंडला विमानानें पाठविण्यांत येत होती व तीवर फळें अशी चिठ्ठी होती. करंडी पाठविणाऱ्याचा पत्ता लागला नाहीं.

**गिरण्या बंद होण्याची शक्यता**—मध्यवर्ती सरकारनें कापडावरील अबकारी जकातीबाबत अधिक सवलतींचें धोरण स्वीकारलें नाहीं तर मुंबईंत आणखी ९ कापडाच्या गिरण्या बंद होण्याची शक्यता आहे, असा इशारा उद्योगपति व अर्थशास्त्रज्ञ श्री. ए. डी. श्रॉफ ह्यांनीं दिला आहे.

**सरदार पटेल ह्यांचें स्मारक**- सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या स्मृतीसाठी भावनगर येथें एक इमारत बांधण्यांत येणार आहे. स्मारकाच्या इमारतीसाठी ५ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. जिल्ह्यांतील राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या एका केंद्रासाठी इमारतीचा उपयोग करण्यांत येणार आहे.

**आंध्र राज्यांतील छोटे पाटबंधारे**—आंध्र राज्य सरकारनें वारंगळ जिल्ह्यांत छोट्या पाटबंधाऱ्यांचीं कामें करण्यासाठी ५ लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. त्याशिवाय अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेचा एक भाग म्हणून आणखी कांहीं पाटबंधारे बांधण्यांत येणार आहेत. त्यासाठी आणखी ४ लाख रुपये मंजूर झाले आहेत.

**अधिक नफा देण्याशीं भुलावण**—मध्यपूर्वेतील देशांतून तेल काढींत असलेल्या ब्रिटिश व अमेरिकन कंपन्या त्या देशांना नफ्याचा ५० टक्के वांटा देतात. पण रशिआनें ९० टक्के नफा देण्याची तयारी दाखविली आहे असें समजतें.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## दि बँक ऑफ सिटिझन्स लिमिटेड, बेळगांव

बँकेची वार्षिक सभा २५ जून, १९५८ रोजीं बँकेचे चेअरमन, श्री. जी. डी. सराफ ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. त्यावेळीं त्यांनीं खालीलप्रमाणें भाषण केलें :—

" ही बँक आतां २२ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. आज बँकेचें भांडवल रु. ४,१२,४७५, राखीव निधी रु. १,०२,१००, एकूण ठेवी रु. २६,३८,१४१ व खेळतें भांडवल रु. ४१,२०,९७५ पवढें आहे. बँकेच्या ठेवींमध्यें गेल्या वर्षीपेक्षा वाढ झाली असून दिलेल्या कर्जाची वसुली समाधानकारक आहे. आपली बँक शेड्यूल्ड बँक होण्यासाठी रिझर्व बँकेकडे प्रयत्न चालू असून त्यासाठी आज लोकांनीं घेतलेल्या शेअरवर प्रत्येकीं रुपये पांच प्रमाणें कॉल केले असून त्याशिवाय २,५०० शेअर विकण्यासाठी कन्ट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूज, न्यू दिल्ली यांचेकडून परवानगी मिळविली आहे. आपली बँक लवकरच शेड्यूल्ड करण्यासाठी सर्व भागीदार वरील नवीन शेअर्स विकत घेऊन व कॉलमनी देऊन, बँकेचें व्यवहारक्षेत्र बळकट करण्यास मदत करतील अशी मी आशा करतों. बँकेची सर्वांगीण उन्नति व्हावी यासाठी स्टेट बँकेमधून सेवानिवृत्त झालेले व अनुभविक एजंट श्रीयुत पी. टी. एन्. स्वामी, बी. ए., सी. ए. आय. आय. बी. यांची बोर्डाकडून जनरल मॅनेजर म्हणून नेमणूक केली आहे. किंमतींचें मान दिवसें-दिवस वाढत असून बँकांमध्यें वाढ होणेस पुष्कळच वाव आहे. कारण लोकांचे जवळ असणाऱ्या सर्व पैशांचे चारपट तरी बँकांमध्यें ठेवी असतात तर आमचेकडे एकपट सुद्धां ठेवी सध्यां नाहींत. तरी होतां होईल तों आपलेकडील पैसा कन्झ्युमर्स गुड्स्-मध्यें खर्च न करतां तो पैसा कॅपिटल गुड्स्मध्यें अगर बँकांमध्यें ठेवींचे रूपानें गुंतविलेस व बँकांनीं आपला पैसा नवीन उत्पादन वाढविणेस कर्जाऊ दिलेस देशांतील उत्पादनामध्यें वाढ होऊन भरमसाट किंमतीचे वाढीलाहि खात्रीनें आळा बसेल. "

वार्षिक सभेनंतर भरलेल्या बोर्डाच्या सभेंत श्री. जी. डी. सराफ ह्यांची १९५८-५९ साठी चेअरमन म्हणून श्री. ए. ए. बंदुकवाला ह्यांची व्हाईस चेअरमन म्हणून निवडणूक झाली.

---

### कापडधंद्यावरील संकट

" १०० वर्षांहून अधिक अनुभव असलेला कापडधंदा आज अडचणींत आहे. कांहीं गिरण्या जुनी, नाकाम झालेली, झिजलेली यंत्रसामुग्री म्हणून बंद पडत आहेत. त्यांच्याजवळ नवीन यंत्र-सामुग्रीला आवश्यक असा पैसा नाहीं. अनेक गिरण्यांत इतका माल पडून आहे व त्याला तूर्त बाजारपेठ नसल्यानें गिरण्या चालविणें तोट्याचें आहे. कांहीं गिरण्या कमी काळ काम करीत असून त्याचा सर्व परिणाम म्हणजे मोठ्या प्रमाणांत बेकारी वाढत असून आर्थिक अरिष्टांचे धोके वाढत आहेत. सरकारला या बिकट प्रश्नाची जाणीव असून यावर उपाययोजना सुचविण्याकरितां टेक्स्टाईल कमिशनरचे अध्यक्षपदाखालीं एक समिति नेमली आहे, त्याचें मी स्वागत करतों. मला आशा वाटते कीं कापडगिरण्यांच्या आजच्या परिस्थितीचीं कारणें शोधतांना त्यांतून मार्ग काढण्याच्या उपाययोजनांवरहि समिति भर देईल. याबाबत मला अशी सूचना करावीशीं वाटते कीं, यापुढें कापडधंद्यांतील उत्पादन योजनाबद्ध होणें इष्ट आहे. देशांतील वापराकरितां व निर्यातीकरितां विशिष्ट पद्धतीचें कापड निर्मिलें पाहिजे. कापडगिरण्या या संपूर्ण वेळ चालल्या पाहिजेत व त्यांतून निघणारे उत्पादनास बाजारपेठ मिळाली पाहिजे. भारतांतील हा सर्वांत मोठा असा संघटित उद्योग आहे. " महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष, श्री. भा. दि. गरवारे, ह्यांचे चेंबरच्या षण्मासिक सभेंतील भाषण.

### अल्पबचतीची गति वाढली पाहिजे

अल्प बचतयोजनेपासून गेल्या सात वर्षांत किती रक्कम जमा झाली, त्याचे आंकडे येथें दिले आहेत :—

| वर्ष | कोटी रुपये |
|---|---|
| १९५१-५२ | ३७.५७ |
| १९५२-५३ | ३९.७९ |
| १९५३-५४ | ३९.६९ |
| १९५४-५५ | ५५.५१ |
| १९५५-५६ | ६७.९१ |
| १९५६-५७ | ६१.५४ |
| १९५७-५८ ( अंदाज ) | ६८.१३ |

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत अल्पबचतींपासून सरकारला २२५ कोटी रु. मिळतील, अशी अपेक्षा होती; परंतु प्रत्यक्ष प्राप्ति २४०.४७ कोटी रुपये झाली; म्हणजे उद्दिष्टापेक्षा प्राप्ति १५.४७ कोटी रुपये अधिक झाली ह्या यशावरून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील अल्पबचतीचें उद्दिष्ट ५०० कोटी रुपयां-पर्यंत वाढविण्यांत आलें. म्हणजे, दरसाल १०० कोटी रु जमा होणें जरूर झालें. तथापि, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत फक्त सुमारें १३० कोटी रुपये जमा झाले; म्हणजे वार्षिक सरासरी ६५ कोटी रुपये एवढीच पडली. उरलेले ३७० कोटी रुपये तीन वर्षांत जमा व्हावयास हवेत. म्हणजे, अल्प-बचतीची वार्षिक सरासरी रक्कम आतां १२३ कोटी रुपयांपेक्षा जास्त होणें आवश्यक आहे. ६५ कोटी रुपयांवरून एकदम १२३ कोटी रुपयांवर वार्षिक बचतीची रक्कम जाणें कठीणच आहे. कमी प्राप्तीच्या लोकांजवळील शिलकीचें प्रमाण महागाई-मुळें व करवाढीमुळें उतरलें आहे; तेव्हां बचतयोजनेपासून होणाऱ्या प्राप्तीची अपेक्षा चुकीची ठरण्याचा संभव आहे. निदान, अपेक्षा व प्रत्यक्ष जमा ह्यांतील तफावत शक्य तेवढी कमी करण्यांत तरी सरकारला यश मिळालें पाहिजे.

---

### पंचवार्षिक योजनेला लागणारा पैसा

केरळ राज्याचे मुख्यमंत्री श्री. नंबुद्रीपाद ह्यांनीं मद्रास येथें केलेल्या भाषणांत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला लागणाऱ्या पैशा-संबंधीं आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, " सुमारें दोन महिन्यांपूर्वीं नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलची बैठक दिल्ली येथें भरली होती. त्यावेळीं असें सांगण्यांत आलें कीं दुसऱ्या पंच-वार्षिक योजनेला लागणारा ४,८०० कोटी रुपयांचा खर्च करतां येणार नाहीं. ह्या खर्चांत ३०० कोटी रुपयांची कपात करून ४,५०० कोटी रुपयेच खर्च करतां येतील. ह्याबाबतींत जितकी सार्वजनिक चर्चा व्हावयास पाहिजे तितकी झाली नाहीं. दुसरी पंचवार्षिक योजना अंमलांत आणण्यासाठी ठरलेल्या ४,८०० कोटी रुपयांच्या ऐवजी ५,५०० कोटी रुपये लागतील. कारण, साधनसामुग्रीच्या किंमतींत वाढ झालेली आहे असें सांगण्यांत येत होतें. म्हणजे नियोजन समितीनें ठरविलेल्या मूळच्या संकल्पांत ३०० कोटी रुपयांची छाटाछाट करून भागणार नाहीं. सुमारें १,००० कोटी रुपयांची कपात करावी लागेल. देशांत पुरेसा पैसा उभारण्याची शक्यता कमी झाल्यानें परदेशांच्या मदतीकडे अधिक लक्ष देण्यांत येऊं लागलें आहे. दोन्ही बाबतींत अडचणीची परिस्थिति आहे हें खरें; पण देशांत ज्यांच्याजवळ पैसा आहे त्यांच्या जवळून तो अधिक प्रमाणांत कां घेण्यांत येऊं नये ? सरकारनें उद्योगपतींच्या नफ्याला कमाल मर्यादा घालून बाकीचा नफा स्वतःकडे घ्यावा. त्यांना सगळा नफा घेऊं देऊन मग कर बसविणें हा मार्ग बरोबर नाहीं. "

# अर्थ

बुधवार, ता. २ जुलै, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## १९५७ मधील बँकिंग

### बँकांची ठेवींसाठी स्पर्धा

१९५६ मध्यें ३ महिने मुदतीच्या ठेवींवर जास्तींत जास्त व्याजाचा दर ४% होता. १९५७ च्या प्रारंभीं तो ४½% झाला. कांहीं महिने तेथें स्थिर राहून वर्षाच्या शेवटच्या तिमाहींत तो ४¾% वर गेला.

### शेडयूल्ड बँकांचें उत्पन्न-खर्च व नफा

पांच कोटी रुपयांपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या २५ मोठ्या शेडयूल्ड बँकांचे आंकडे पाहिले, तर त्यांचें ठोक उत्पन्न १९५६ चे मानानें १९५७ सालीं ९·७ कोटी रुपयांनीं वाढलें. खर्चहि ८·९ कोटी रुपयांनीं वाढून निव्वळ नफा ८० लक्ष रुपये अधिक झाला. खालील तक्ता हें स्पष्ट दर्शवितो:—

#### २५ मोठ्या शेडयूल्ड बँकांचें उत्पन्न व खर्च
(आंकडे कोटी रुपयांचे)

| | | १९५६ | १९५७ |
|---|---|---|---|
| १. ठोक उत्पन्न | ... | ४४·० | ५३·७ |
| (१) व्याज व डिस्कौंट | | ३२·९ | ४१·० |
| (२) इतर उत्पन्न | ... | ११·१ | १२·७ |
| २. खर्च ... | ... | ३६·३ | ४५·२ |
| (१) ठेवींवरील व्याज | ... | १४·५ | २०·६ |
| (२) नोकरांचा पगार | ... | १६·२ | १८·३ |
| (३) इतर खर्च | ... | ५·६ | ६·३ |
| ३. निव्वळ नफा | ... | ७·७ | ८·५ |

### वसूल भांडवल-रिझर्व्हचें ठेवींशीं प्रमाण उतरलें

ठेवींच्या वाढीच्या मानानें शेडयूल्ड बँकांचें वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांत बेताचीच वाढ झाली. पण, १९५६ मधील १·५ कोटी रुपयांच्या वाढीच्या मानानें १९५७ मधील ५·० कोटी रुपयांची वाढ भरघोस आहे. बँक ऑफ पतियाळा व स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र ह्यांची शेडयूल्ड बँकांत गणना झाल्यामुळें वसूल भांडवल व रिझर्व्ह ह्यांची रकम एवढी वाढलेली दिसते. ठेवींतील मोठ्या वाढीमुळें वसूल भांडवल व रिझर्व्हचें ठेवींशीं प्रमाण ६·२% वरून ५·४% वर उतरलें. दोन महत्त्वाच्या बिगर-शेडयूल्ड बँका शेडयूल्ड झाल्यामुळें, बिगर-शेडयूल्ड बँकांच्या भांडवल-रिझर्व्हमध्यें स्वाभाविकच घट झाली. तथापि, त्यांच्या वसूल भांडवल-रिझर्व्हचें ठेवींशीं प्रमाण १६·६% चें १८·४% झालें. कारण, त्यांच्या ठेवींत २४ कोटी रुपयांची घट झाली. ३९२ बँकांच्या उपलब्ध आंकड्यांपैकी ११ बँकांजवळ मुळींच रिझर्व्ह नव्हतें. (त्यांत दोन शेडयूल्ड बँकांचा समावेश आहे.) ९३ बँकांचे रिझर्व्ह त्यांच्या वसूल भांडवला-इतके किंवा त्यापेक्षा अधिक होते.

#### हिंदी बँकांचें वसूल भांडवल, रिझर्व्ह व ठेवी
(आंकडे कोटी रुपयांचे)

| वसूल भांडवल व रिझर्व्हचा आकार | एकूण वसूल भांडवल व रिझर्व्ह | | | ठेवी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९५५ डिसें. | १९५६ डिसें. | १९५७ डिसें. | १९५५ डिसें. | १९५६ डिसें. | १९५७ डिसें. |
| १. ५०,००० रु. खाली | ०·१ | — | — | ०·२ | ०·१ | — |
| २. ५०,००० ते १ लक्ष रु. | ०·७ | ०·७ | ०·६ | २·४ | २·५ | २·० |
| ३. १ लक्ष रु. ते ५ लक्ष रु. | ३·९ | ३·६ | ३·५ | १९·४ | २०·७ | १९·२ |
| ४. ५ लक्ष रु. ते ५० लक्ष रु. | १३·४ | १३·५ | १३·१ | ९८·७ | १०५·६ | ११०·३ |
| ५. ५० लक्ष रु. चे वर | ५४·९ | ५५·२ | ५६·९ | ७६९·३ | ८५१·५ | १,०७२·३ |
| एकूण | ७३·० | ७३·१ | ७४·१ | ८८९·९ | ९८०·४ | १,२०३·८ |

### बँकांच्या कचेऱ्यांत वाढ

१९५७ मध्यें बँक कचेऱ्यांची संख्या १८३ नें वाढून ४,३७६ झाली. शेडयूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ३१० ची भर पडली; पण त्यापैकी १०० कचेऱ्या पूर्वी बिगर-शेडयूल्ड असलेल्या पण आतां शेडयूल्ड झालेल्या दोन बँकांच्या होत्या. बिगर-शेडयूल्ड बँकांनीं जेवढ्या नव्या कचेऱ्या उघडल्या त्यापेक्षा जास्त कचेऱ्या बंद केल्या व एकूण संख्येंत १८ ची ची घट झाली. एकट्या स्टेट बँक ऑफ इंडियानेंच ८४ नव्या कचेऱ्या उघडल्या. विदेशी बँकांच्या कचेऱ्यांत वाढ अथवा घट झाली नाहीं. १९५७ मध्यें उघडण्यांत आलेल्या कचेऱ्यांपैकी ६७ मद्रासमध्यें, ४३ मुंबईत, २३ म्हैसूरमध्यें, २० आंध्र प्रदेशांत, १९ केरळांत, १६ उत्तर प्रदेशांत, १३ पंजाबांत, १२ प. बंगालमध्यें व ११ मध्यप्रदेशांत होत्या. ७० कचेऱ्या बंद करण्यांत आल्या, त्यांपैकी २८ केरळांत, ११ मद्रासमध्यें, ८ मुंबईत व ६ उत्तर प्रदेशांत होत्या.

#### शेडयूल्ड व बिगर-शेडयूल्ड बँक कचेऱ्यांची संख्या

| | शेडयूल्ड बँका | बिगर-शेडयूल्ड बँका | सर्व बँका |
|---|---|---|---|
| १. नव्या कचेऱ्या उघडल्या | +२२० (+८५) | +३३ | +२५३ |
| २. दुसऱ्या शेडयूलमध्यें वर्ग झाल्यामुळें झालेला बदल | +१०९ | −१०९ | — |
| ३. जुन्या कचेऱ्या बंद केल्या | −१९ (−१) | −५१ | −७० |
| ४. निव्वळ वाढ अथवा घट | +३१० (+८४) | −१२७ | +१८३ |

कंसांतील आंकडे स्टेट बँकेच्या कचेऱ्यांचे आहेत.

## सौराष्ट्रांतील पाणीपुरवठा खरोखरच वाढला काय ?

रा. ब. न. स. जोशी, बी. ई, (सिव्हिल),
एम. आय. ई. ( इं. ), एम्. आर. सॅन. आय. (लंडन),
सेवानिवृत्त सुपरिंटेंडिंग इंजिनियर, मुंबई प. वर्क्सखातें,
ह्यांचें पत्र.

संपादक "अर्थ" ह्यांस सा. न. वि. वि.

आपल्या बुधवार दिनांक २५ जून १९५८ च्या अंकांत २०१ पानावर "सौराष्ट्रांतील पाणीपुरवठा" या शीर्षकाखालीं कांहीं माहिती व उपयुक्त आंकडे दिलेले आहेत. त्यांत प्रथम पंचवार्षिक योजनेपूर्वी ३०,००० एकर जमिनीला पाट-बंधाऱ्यांचें पाणी मिळत असें, असें छापलें आहे. पुढें असेंहि छापलें आहे कीं, प्रथम पंचवार्षिक योजना पुरी झाल्यावर १,९७,००० एकर जमिनीला पाणीपुरवठा होऊं लागला. याचा अर्थ असा होतो कीं, :( १,९७,० ०–३०,००० ) अशा एकूण १,६७,००० एकर जमिनीला नव्यानें पाणी मिळावयास लागलें. या आंकड्यांच्या बाबतींत अनेक शंका उपस्थित होतात. हे आंकडे फक्त major ( मोठे ) कालव्यांनीं भिजणाऱ्या जमिनीचे कीं, मोठ्या व धाकट्या ( major and minor ) कालव्यांनीं भिजणाऱ्या जमिनीचे? दुसरी व मुख्य अडचण ही कीं, हा आंकडा प्रत्यक्ष पाणी मिळालेल्या जमिनीच्या क्षेत्राचा, कीं अंदाजी? शिवाय, अंदाजी आंकडा कसा काढला ? पूर्वी एका राज्यांत ( state ) झालेल्या खर्चाच्या प्रमाणांत क्षेत्र भिजलें आहे असें धरून आंकडे काढले होते. तशांतला तर हा आंकडा नव्हे ना? आणखी एक शंका अशी कीं, हा आंकडा मशागत क्षेत्रा ( area under command ) चा आहे कीं प्रत्यक्ष भिजलेल्या क्षेत्राचा ? पुष्कळांना मशागत क्षेत्र (area under command) व भिजलेली जमीन ( area irrigated ) या मधील फरकच कळत नाहीं !

वरील शंका येण्याचें कारण, १९५५–५६ सालीं ( म्हणजे पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या वर्षीं ) सौराष्ट्रांतील १,०८,००० एकर क्षेत्रासच मोठ्या कालव्यांनीं (major works) पाणी मिळूं शकेल असें प्रथम पंचवार्षिक योजनेच्या Development schemes या पुस्तकांत छापलें आहे. १,०८,००० एकरांऐवजीं, १,६७,००० एकर'ना प्रथम पंचवार्षिक योजनेमुळें मोठ्या कालव्यांनीं पाणी मिळूं लागलें असलें तर पूर्वीच्या सौराष्ट्र सरकारला ( अर्थात् सध्यांच्या मुंबई सरकारला ) खरोखरच धन्यवाद द्यावयास पाहिजेत !

न. स. जोशी.

## हातकागद संशोधन केंद्र

हात-कागद संशोधन केंद्राचें काम मुंबई राज्यांत १९४० पासून चालू आहे. विशेष म्हणजे या उद्योगाच्या पुनरुत्थापनेच्या कामांमध्यें हें केंद्र सर्व देशांत अग्रेसर राहिलें आहे.

या संशोधन केंद्रानें आपल्यापुढें द्विविध कार्यक्रम ठेवलेला होता.

( १ ) ड्रॉइंग पेपर, दस्तैवजी कागद, फिल्टर पेपर आदि परदेशांतून भारतांत आयात होणाऱ्या उच्चश्रेणीच्या कागदाची देशी हातकागद उद्योगाद्वारें निर्मिति.

( २ ) लहान लहान प्रमाणांत प्राप्त होणाऱ्या स्थानिक कच्च्या मालापासून छोट्या व साध्या अवजारांच्या उपयोगानें नित्योपयोगी कागद घरगुती उद्योगाच्या पायावर तयार करणें.

यापैकीं उच्चश्रेणीच्या कागदाच्या बाबतींत केंद्रास चांगलें यश मिळालें असून परदेशी कागदाच्या तोडीचा ड्राईंग पेपर दस्तैवजी कागद, फिल्टर, वगैरेची पैदास नियमितपणें चालू आहे.

आज विशाल मुंबई राज्यांत कागदनिर्मितीचीं ३३ केंद्रें चालू आहेत. या सर्व केंद्रांत सुमारें ६०० लोक काम करितात व सर्व प्रकारचा मिळून १७५ टन कागद तयार होतो.

हातीं असलेल्या योजना पूर्ण झाल्या म्हणजे मुंबई राज्यांतील केंद्रांची संख्या ५० पर्यंत जाईल व कागदाची आणि पुठ्याची पैदास सालीना ६०० टन होईल. याची एकूण विक्रीची किंमत ७ लक्ष रुपयांवर जाईल व सुमारें १,००० लोकांना रोजगार मिळेल.

ह्या कागदाची किंमत बाजारभावापेक्षा अधिक राहील. परंतु रोजगार व उत्पादनवाढीकडे लक्ष देऊन सरकारी कचेऱ्या ग्रामपंचायती, प्राथमिक व दुय्यम शाळा, आदि संस्थांना हा माल घेण्यास उद्युक्त करतां येण्याजोगें आहे.

**चंदनाच्या तेलाचा कारखाना**—म्हैसूर सरकारनें चंदनाचें तेल तयार करण्याचा सार्वजनिक मालकीचा एक कारखाना काढण्याचें नुकतेंच जाहीर केलें होतें. मुंबई, कानपूर व मद्रास मधील चंदनाच्या तेलाच्या कारखानदारांनीं "असा कारखाना काढून, म्हैसूर सरकारनें आमच्या क्षेत्रावर आक्रमण करूं नये" अशी विनंती केली आहे.

### मध्यवर्ती सरकारचें राज्य सरकारांना साह्य
( आंकडे कोटी रुपयाचे )

| वर्ष | मध्यवर्ती सरकारचें साह्य | | | | राज्यांचा खर्च | | | प्रमाण % | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भाग भांडवल | मदत | कर्जें | एकूण | चालू खर्च | भांडवली खर्च | एकूण | (२+३) चे (६) शीं | (५) चे (८) शी |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १९५१–५२ | ५२·९ | ३३·९ | ७३·३ | १६०·१ | ३९२·७ | १५१·३ | ५४४·० | २२·१ | २९·४ |
| १९५२–५३ | ७३·८ | ३६·० | १११·८ | २२१·६ | ४१७·० | १५५·५ | ५७२·५ | २६·३ | ३८·७ |
| १९५३–५४ | ७२·८ | ४५·३ | १५४·७ | २७२·८ | ४४८·२ | १७६·८ | ६२५·० | २६·३ | ४३·६ |
| १९५४–५५ | ७१·६ | ५१·४ | २२०·७ | ३४३·७ | ४९५·६ | २०५·९ | ७०१·५ | २४·८ | ४९·० |
| १९५५–५६ | ७३·६ | ९७·७ | २६१·७ | ४३३·० | ६०५·१ | ३४२·३ | ९४७·४ | २८·३ | ४५·७ |
| १९५६–५७ | ७४·५ | १२२·० | २८७·९ | ४७९·६ | ६३०·७ | ४१०·० | १०४०·७ | ३१·२ | ४६·१ |
| १९५७–५८ | १२०·९ | १३८·४ | २८७·९ | ५४७·१ | ७०५·६ | ३७४·५ | १०८०·१ | ३६·७ | ५०·६ |
| १९५८–५९ | १५७·५ | १४६·१ | २८४·९ | ५८८·१ | ७५४·८ | ३७९·६ | ११३४·४ | ४०·२ | ५१·८ |

## ग्रामदान कशासाठी ?

[ मा. द. आपटे एम्. ए. (अर्थशास्त्र) ]

### ग्रामदानासाठी चळवळ कशाला ?

इंग्रज आपल्या देशांत आल्यापासून आपल्या सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितींत फार झपाट्यानें बदल होत गेला सुरवातीच्या काळांत अगदी लहान स्वरूपांत निर्माण झालेल्या समाजसुधारणेच्या, स्वराज्यप्राप्तीच्या व स्वदेशीच्या चळवळींना कालांतरानें हळू हळू व्यापक व भरीव स्वरूप आलें, आणि म्हणूनच स्वराज्यप्राप्तीनंतरची आपली एकंदर स्थिति दीडशें वर्षापूर्वीच्या परिस्थितीशीं तुलना करतां बिलकुल वेगळी झालेली आढळून येते.

आज आपल्या देशवासीयांमध्यें एक विशेष प्रकारची जागृति झालेली आहे. त्यांतील विशेष गोष्ट अशी आहे कीं, समाजांतील सर्व थरांच्या लोकांत, विशेषतः आपली आर्थिक उन्नति झाली पाहिजे, अशी ईर्षा निर्माण झालेली आहे. मागासलेल्या किंवा ग्रामीण भागांत राहून यापुढें आपला निभाव लागणार नाहीं, व यापेक्षा शहरांतून जाऊन, किंवा सुधारलेल्या भागांत जाऊन, आधुनिक पद्धतींच्या साहाय्यानें आपण श्रीमंती प्राप्त करून घ्यावी असा विचार बळावत चालला आहे. बुद्धिजीवी, व्यापारी, श्रीमंत किंवा कर्तबगार लोकांचा व्यापक व वेगवान अशा आर्थिक पद्धतींशीं दिवसेंदिवस वाढता संबंध येत असल्यामुळें, आपल्या महत्त्वाकांक्षांच्या पूर्ततेसाठी खेडेगांवांतून उठून ते सर्व शहरांकडे निघाले आहेत.

याशिवाय, ग्रामीण भागांतील स्थिति विशिष्ट वर्गांच्या लोकांना दिवसेंदिवस अधिकच अडचणींची होत चालली आहे. आज-पर्यंत मानानें जीवन जगणाऱ्या लोकांना अपमान सहन करून जगण्याची पाळी आली आहे. श्रीमंत व व्यापारीवर्गाला वर्ग-द्वेषाच्या प्रसारामुळें आपल्या भविष्यकाळासंबंधीं साशंकता वाटूं लागली आहे. जमीनदार किंवा सधन शेतकरी वर्गाचें अस्तित्वहि डळमळीत होत चाललें आहे.

याचा परिणाम म्हणून ग्रामीण भागांत आजपर्यंत ज्यांचें प्रस्त होतें किंवा विशिष्ट वर्गांच्या किंवा दर्जाच्या लोकांचे हातांत त्या भागांतील सूत्रें होतीं, ती स्थिति नष्ट होत चालली आहे. परिस्थितीच अशी निर्माण होत आहे कीं, वर उल्लेखिलेल्या लोकांनीं आपले हितसंबंध ग्रामीण भागांबाहेरच निर्माण केले पाहिजेत, त्याला दुसरा इलाज नाहीं. यामुळें ग्रामीण भागांतील हकदार वर्ग आपोआपच नाहींसा होत आहे. असें झालें तर आपोआपच आम जनता खेड्यांची मालक बनेल.

### मग आमचें सरकार काय करणार ?

ग्रामदानानंतर जमीनविषयक सुधारणा करण्यास, तसेंच ग्रामीण भागांत आवश्यक अशा सामाजिक व आर्थिक सुधारणा घडवून आणण्यास फार सोपें जाईल असें कांहींचें मत आहे. तें संपूर्णपणें मान्य केलें तरीहि ग्रामदानानंतर ज्या नवीनच समस्या निर्माण होतात त्यांचा विचार करूं लागल्यास, त्यांची गुंतागुंत व बिकटपणा इतका जाणवतो कीं त्यापेक्षा ग्रामदान नाहींच झालें तर बरें, असें म्हणण्याचा प्रसंग येतो.

ग्रामदानानंतर तेथील जनतेच्या पोषणाची व वाढीची जबाब-दारी घ्यावी लागेल. ती कोणी घ्यावयाची व ती कशी पार पाडावयाची ? आर्थिक विकासाकरितां सर्व क्षेत्रांत योजनापूर्वक प्रगति घडवून आणावयाची, ती कशी ? इत्यादि प्रश्नांचा उलगडा व्हावा लागेल. याकरितां सगळ्यांत महत्त्वाची बाब म्हणजे ग्रामीण भागांतील निर्णायक सत्ता कोणती व तिचें स्वरूप कसें असावें हें ठरविलें पाहिजे. ग्रामदानानंतरचें आजचें स्वरूप व भविष्यकाळीं विकसित होत जाणारें स्वरूप, हें कोण व कसें ठरविणार, इत्यादि प्रश्न उलगडतच नाहींत.

आमचें म्हणणें असें कीं, याचकरितां आम्हांला सरकार हवें. समाजांतील सार्वभौम सत्ता सरकारच असली पाहिजे; अन्य कोणीहि असून चालणार नाहीं. येवढेंच नव्हे तर कोणत्याहि समाजानें एखादी वैशिष्ट्यपूर्ण संस्कृति निर्माण केली तर तिचें सातत्य, विकास किंवा दीर्घकाळ अस्तित्व ठेवण्याचें काम सर-कारच करूं शकतें.

आधुनिक काळांत तर सरकार म्हणजे सर्व जनतेच्या इच्छा-आकांक्षांचें प्रतीक म्हणून ओळखलें जातें. म्हणून हें काम सरकारचेंच आहे असें आमचें स्पष्ट मत आहे. नाहीं तर आम्हीं विचारतों कीं आमचें सरकार काय करतें आहे ?

### सरकारच्या अपयशाची कबुली ?

स्वराज्य मिळाल्याबरोबर आमच्या मतें भारत सरकारनें आपल्या जबाबदाऱ्या गृहीत धरून त्यासाठी वेगानें खटपट सुरू केली आहे. आर्थिक विकासासाठी पंचवार्षिक योजना, नवसमाज-निर्मितीसाठी समाजविकास योजना, इत्यादि प्रकारचें भरीव कार्य सुरू केलें आहे. आपलें ध्येय लोककल्याणकारी राज्य स्थापण्याचें आहे, हें पण जाहीर केलें. येवढेंच नव्हे तर, आर्थिक विषमता कमी करून बहुजन समाजाच्या सुखासाठी सरकार झटत आहे. या प्रयत्नांच्या यशापयशाचा विचार तूर्त बाजूला ठेवूनहि, सरकारलाहि जें जमूं शकलें नाहीं तें इतर कोणाला जमेल यावर आमचा विश्वास नाहीं.

शिवाय ग्रामदान किंवा तत्सम कांहीं चळवळींतून हें साध्य होईल असें म्हणण्यांत 'सरकार' या संस्थेच्या अपात्रतेची आपण ग्वाही दिल्यासारखें होत नाहीं का ?

आमच्या मतें आज आपण क्रांतीनंतरच्या अवस्थेंत आहों. आपल्याला नवीनच सामाजिक, राजकीय व आर्थिक व्यवस्था रूढ करावयाची आहे. म्हणून एखादी व्यवस्था रूढ करून ती राबवावयाची कशी, असा आपल्या समोर प्रश्न आहे.

निरनिराळ्या देशांत क्रांत्या झाल्या. क्रांतीनंतरचें कार्य प्रत्येक वेळीं सरकारनें केलें. तें इतर कोणाला करतां येणार नाहीं असा त्या क्रांतीचा इतिहास सांगतो. भारतांतहि आतांचा काळ क्रांतीनंतरचा आहे. म्हणून यानंतरचें कार्य सरकारचेंच आहे.

### क्रांति नको !!

गेल्या दहा वर्षांतील परिस्थिति पाहूं जातां जनतेंतील असंतोष कमी न होता वाढतच आहे. सरकारचा दरारा कमी कमी होत आहे. कोणत्याहि राजकीय पक्षावर जनतेचा पुरेसा विश्वास नाहीं. अशा वेळीं सरकार अमूक करण्यास अपात्र आहे हें म्हणणें कितपत हितकारक आहे ?

म्हणून, ग्रामदानाची चळवळ जर सरकारला अमूक करतां येत नाहीं व आपण म्हणजे प्रतिसरकार आहों या भावनेंतून निर्माण होऊन वाढत असेल, तर तें आम्हांला बिलकूल पसंत नाहीं. याउलट, सरकारच आमच्या सर्व आकांक्षा पूर्ण करील असा आमचा दृढ विश्वास आहे.

**बिल मार्केट योजनेखाली रिझर्व्ह बँकेनें मंजूर केलेलीं कर्जें उद्देशानुसार छाननी**

**( १९५६–५७ )**

| | किती अर्जे-दारांना ? | किती रक्कम ? (कोटी रु.) |
|---|---|---|
| १. उद्योगधंदे | | |
| कपास कापड | १०४ | ३८·१३ |
| ताग | ३६ | २०·६५ |
| साखर | ३२ | १७·०५ |
| खाणी | ४ | ०·७० |
| इंजिनिअरिंग | ३६ | १९·०८ |
| खनिज तेलें | २ | ५·५० |
| रंग व रसायनें | १४ | ५·६९ |
| सिमेंट | ३ | १·०४ |
| चहा | १२ | २·३२ |
| मोटारी | १० | ६·१२ |
| रबर | ५ | २·१२ |
| इतर | ९१ | २३·३२ |
| | ३४९ | १४१·७२ |
| २. व्यापार | | |
| शेतमालाचे व्यापारी | | |
| अन्नधान्यें | ४४ | ०·७४ |
| कपास | ७७ | १७·३६ |
| ताग | २ | २·०६ |
| साखर | ६ | १·१४ |
| चहा | १ | ०·०१ |
| इतर | १० | २·५४ |
| | १४० | २३·८५ |
| इतर मालाचे व्यापारी | | |
| कपास कापड | ३८ | १·०४ |
| लोखंड, पोलाद, मशिनरी. | ३३ | १०·९९ |
| रंग. रसायनें | ११ | १·०७ |
| खनिजें | ९ | ०·७० |
| इतर | ३६ | २·९२ |
| | २६७ | ४०·५७ |
| एकूण | ६१६ | १८२·१९ |

**बँकांकडील ठेवींत मुदती ठेवींची वाढ**

| शेवटचा शुक्रवार | एकूण ठेवी | मुदती ठेवी |
|---|---|---|
| १९५१–५२ | ८४८·३४ | २८१·०५ |
| १९५२–५३ | ८४३·९३ | ३११·११ |
| १९५३–५४ | ८५५·७७ | ३२७·०१ |
| १९५४–५५ | ९५१·१४ | ३७६·८८ |
| १९५५–५६ | १०५१·०२ | ४१५ ३५ |
| १९५६–५७ | ११८५·५४ | ४७३·६६ |
| १९५७–५८ | १४७९·७५ | ७३४·५० |

**कोसी नदीच्या कांठाचे बांध**— बिहारमधील कोसी नदीच्या कांठांना १५० मैल लांबीचे बांध घालण्याचें काम चालू होतें, तें आतां संपत आलें आहे. कोसीला येणाऱ्या पुरामुळें जी हानि होते, ती टाळण्यासाठी बांध घालण्यांत आले आहेत. बांधकामासाठीं ११·५५ कोटी रुपये खर्च आला. कामाला १९५५ च्या जानेवारींत प्रारंभ करण्यांत आला होता.

**रेल्वेची तांत्रिक शाळा**—दक्षिण भारतांत त्रिचनापल्ली येथें रेल्वेवरील कामें करण्याचें शिक्षण देण्यासाठी एक तांत्रिक शाळा उघडण्यांत येणार आहे. सध्यां दक्षिण रेल्वेवर असें शिक्षण देण्याची थोडीबहुत सोय आहे. रेल्वे बोर्डानें नव्या शाळेसाठी ६० एकर जागा मिळविण्याचें ठरविलें आहे.

**हिंदी साहित्यिकाचें स्मारक**—काशी नागरी प्रचारिणी सभेनें सुप्रसिद्ध हिंदी साहित्यिक श्री. प्रेमचंद ह्यांच्या जन्मग्रामीं त्यांचें स्मारक उभारण्याचें ठरविलें आहे. हिंदी वाङ्मयाचा प्रचार करणारी ही फार जुनी संस्था आहे. श्री. प्रेमचंद ह्यांच्या स्मारकासाठी सभेनें १,२५,००० रुपयांचा निधी जमविण्याचें ठरविलें आहे.

**नागपूरमधील गलिच्छ वस्त्या**— नागपूरमधील दोन गलिच्छ वस्त्या उठवून त्यांतील रहिवाशांची दुसरीकडे सोय करणाऱ्या दोन योजना मुंबई सरकारनें तयार केल्या होत्या. त्यांना मध्यवर्ती सरकारनें मान्यता दिली आहे. दोन्ही योजनांना मिळून ५ लाख रुपये खर्च येणार आहे व त्यामुळें ४०० कुटुंबांची सोय होणार आहे.

**पाणीपुरवठा योजनेसाठी कर्ज**—पूर्व खानदेश जिल्ह्यांतील धरणगांव म्युनिसिपालिटीनें आखलेल्या पाणीपुरवठ्याच्या योजनेसाठी मुंबई सरकारनें ८,६०,००० रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. कर्जावर ४॥ टक्के दरानें व्याज घेण्यांत येणार असून त्याची फेड ३० सारख्या वार्षिक हप्त्यानें करावयाची आहे.

**वैमानिकाशिवाय विमान**—जपानच्या संरक्षण खात्यानें असें जाहीर केलें आहे कीं, वैमानिकाशिवाय भ्रमण करणाऱ्या एका विमानाची चांचणी लवकरच करण्यांत येणार आहे. विमानाचा पुढील नाकासारखा भाग पारदर्शक बनविण्यांत आला असून जमिनीवरून धाडण्यांत येणारे नियंत्रक संदेश त्यांत बसविलेला टेलिव्हिजन कॅमेरा अंमलांत आणील.

**परदेशांतील हिंदी तंत्रज्ञ**—१९५७ सालीं संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या तांत्रिक साह्याच्या योजनेप्रमाणें निरनिराळ्या देशांना २,५१२ कुशल तंत्रज्ञ पुरविण्यांत आले. ह्यांपैकी १०० तंत्रज्ञ हिंदी असून ते परदेशांत काम करीत आहेत. एकूण १३२ देशांना योजनेचा लाभ मिळाला.

**पावसाच्या अभावाचा परिणाम**—राधानगरी वीज-निर्मिति केंद्रांतून मिरज, कोल्हापूर, इचलकरंजी इत्यादि ठिकाणांना विजेचा पुरवठा करण्यांत येतो. पण ह्या वर्षी पावसाळ्याची सुरुवात उशिरा झाल्यानें धरणांतील पाण्याची पातळी फार कमी झाली होती. त्यामुळें वीज निर्माण करण्यास अडचण निर्माण होण्याचा संभव होता.


**साखरेचें उत्पादन**—भारतामधील साखरेच्या कारखान्यांनीं मे अखेरपर्यंत १९·६३ लाख टन साखरेचें उत्पादन केलें. गेल्या वर्षीच्या हंगामांत साखर कारखान्यांनीं १९·७५ लाख टन साखर निर्माण केली होती. ३१ मे, १९५८ अखेर कारखान्याजवळ १२·१२ लाख टन साखर शिल्लक होती.

**संस्कृत विद्यापीठाची स्थापना**—हैद्राबाद येथील संस्कृत शिक्षण कौन्सिलनें दक्षिण भारतासाठी एक संस्कृत विद्यापीठ स्थापन करण्याची तयारी चालविली आहे. विद्यापीठ बहुधा हैद्राबाद शहरांत स्थापन करण्यांत येईल. विद्यापीठासाठी लागणारी जमीन व इमारती ह्यांची देणगी एका धनिकाकडून मिळणार आहे.

**आद्य शंकराचार्यांची समाधि**—आद्य शंकराचार्यांची समाधि हिमालयांतील केदारनाथ ह्या ठिकाणीं आहे. १,२०० वर्षांपूर्वी बांधलेल्या ह्या समाधीचा लवकरच जीर्णोद्धार करण्यांत येणार आहे. समाधीचें दर्शन घेण्यासाठी दरसाल हजारों यात्रेकरू जातात. जीर्णोद्धाराच्या इमारतीचा नमुना उत्तरप्रदेश सरकार तयार करणार आहे.


**अमेरिकेचा नवा उपग्रह**—अमेरिकेच्या हवाई दलातर्फे ह्या वर्षाच्या अखेरीस एक नवा उपग्रह सोडण्यांत येणार आहे अशी वार्ता आहे. ह्या उपग्रहाचें वजन १,२०० पौंड असेल व तो अंतरिक्षांत फेकण्यासाठी खंडापासून खंडापर्यंत जाऊं शकणाऱ्या अग्निबाणाचा उपयोग करण्यांत येईल. त्यांतील कॅमेरा ४०० मैल उंचीवरून पृथ्वीचीं छायाचित्रें घेऊं शकेल.


PRATIBHA/LIC/ 1



मी अजून त्याचा विचारच केला नाहीं...

प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करावयाची पद्धत उत्तमच, पण विमा उतरवावा कीं नाहीं याचा विचार करीत बसलांत तर कोणी सांगावं. उद्यां तुमचं काय बरं वाईट होईल आणि मग विमा न उतरविल्याचा परिणाम तुमच्या लाडक्या मुलाबाळांना आणि बायकोला भोगावा लागेल. तुमचं वय अजून कांहीं फार नाहीं, म्हणून आजच्या इतका स्वस्त विमा पुढें कधींहि मिळूं शकणार नाहीं. विमा उतरवा आणि आपला भविष्यकाल सुरक्षित करा.



लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

सेंट्रल ऑफिस : "जीवन केंद्र" जमशेटजी टाटा रोड, मुंबई-१

## सातारा जिल्हा को. ऑप. लँड मॉर्गेज बँक लिमिटेड कराड–सांगली

### अन्नधान्याचें उत्पादन वाढविणेकरितां शेतकऱ्यांच्या कर्जाची खास सोय

**सवलतीच्या दरानें कर्ज व शिवाय रु. ५०० पर्यंत बक्षिस**

**नव्या विहिरीकरतां ! एंजिन, इ. मोटारकरतां ! !**

शेतकरी लोकांना कर्जातून मोकळें होणेची, जमीन सुधारणेची, विहीर दुरुस्त करणेची अगर नव्या विहिरी काढणेची, इंजिनादि खरेदी करणेकरतां कर्ज मिळणेची अमूल्य संधि मिळाली असून या संधीचा फायदा घेणेकरतां या बँकेकडून गेलीं २२ वर्षे हजारों शेतकरी बांधवांना लाखों रुपये कर्जे देण्यांत आलेलीं आहेत. आणि या कर्जाची परतफेडहि शेतकऱ्यांना परवडतील अशा १० ते १५ हप्त्यांमध्यें केली जाते हें आपल्या दोन्ही जिल्ह्यांतील शेतकरी बांधवांना माहीत आहेच.

२ रे पंचवार्षिक योजनेंत लांब मुदतीच्या कर्जाची आपल्या राज्यांत भरभराट व्हावी अशा उच्च हेतूनें मुंबई सरकारनें शेतकऱ्यांना नवीन विहिरी खोदणेस व जुन्या विहिरी दुरुस्त करणेस कर्जरूपानें या बँकेमार्फत आर्थिक स्वरूपांत मदत देणेचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें विहिरीवर एंजिन, मोटार, इत्यादि बसवून जास्तींत जास्त जमिनी बागायत करणेची योजना आहे ती खालीलप्रमाणें :—

(१) शेतकरी बांधवांना नवीन विहिरी काढण्याकरितां जरूर तितकें कर्ज तर मिळणार आहेच; याशिवाय कर्जरकमेची चौथाई अगर जास्तींत जास्त ५०० रुपयेपर्यंत या बँकेमार्फत सबसिडी ( मोफत मदत ) मिळणार आहे.

(२) कर्जाचीफेड वार्षिक १० ते १२ हप्त्यांनीं होणेची आहे.

(३) नवीन विहीर, अगर जुन्या विहिरीच्या दुरुस्तीकरतां ४॥ टक्केप्रमाणें व्याज आकारलें जाणार आहे.

(४) कर्ज जमिनीचे तारणावर आकाराचे ९० पट मिळणार आहे. उदा : – १० रुपये आकाराचे जमिनीवर जास्तींत जास्त ९०० रुपये मिळूं शकतील. त्याचप्रमाणें विहिरीवर इंजिन अगर इ. मोटार बसविण्याकरतां वरीलप्रमाणेंच कर्ज मिळणार असून त्याचेहि १० ते १२ वार्षिक हप्ते राहतील. मात्र व्याजाचा दर ५॥ टक्के प्रमाणें राहणार असून त्यासहि सरकारकडून जास्तींत जास्त ५०० रु. ची मदत देणेचा विचार चालूं आहे.

(५) जमीनसुधारणा, ताली, पड जमीन लागवडीखाली आणणें, बुलडोझर इ. यंत्राच्या साह्यानें जमीन एका पातळींत आणणेस अगर फळफळावळीची बाग तयार करणेस ५॥ टक्के व्याजाचे दरानें वरीलप्रमाणेंच आकाराचे ९० पट कर्ज देणेचें ठरलेलें आहे. तेव्हां शेतकरी बांधवांनीं या संधीचा फायदा अवश्य घ्यावा. ज्या शेतकऱ्यांना नवीन विहीर खोदण्याच्या असतील अगर जुन्या विहिरी दुरुस्त करणेचे असतील त्यांनीं लँड मार्गेज बँकेकडे जास्त खुलाशाकरतां चौकशी करावी. ७/१२ खातेंउतारा व फेरफाराचे उतारे जोडून अर्ज बँकेकडे करावेत अर्जाचा नमुना बँकेंत मिळतो.

प्रत्येक शेतकऱ्यानें आतांच आपली योजना आंखून इकडे सत्वर अर्ज करावेत, अशी या पत्रकाद्वारें विनंती करीत आहे.

नी. आ. कल्याणी,
चेअरमन

## दि कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि.

### कारखान्यानें दोन लाख पोतीं साखर उत्पादनाचें उद्दिष्ट गांठलें.

या कारखान्याची १९५७–५८ हंगामाची ऊंस गळिताची सुरवात दि. ३१ ऑक्टोबर १९५७ रोजीं होऊन समाप्ति दि. २४ मे १९५८ रोजीं झाली. या हंगामांत कारखाना एकूण २०५ दिवस चालला व सदरहू मुदतींत कारखान्याचें साखरेचें उत्पादन २,०१,३०१ पोतीं इतकें झालें. या कारखान्याची साखर शुभ्र व दाणेदार अशी उत्तम प्रतीची असून तिला मुंबई व इतर बाजारपेठांमध्यें फार मागणी आहे.

भारतांतील बहुजन समाज जो शेतकरीवर्ग त्यांचा सर्वांगीण उन्नतीचा मार्ग सहकारामध्येंच आहे हें तत्त्व सर्वमान्य झाल्यानें भारतीय शेतकऱ्यांचा प्रत्येक व्यवहार हा सहकारी संस्थांमार्फतच झाला पाहिजे या दृष्टीनें आपल्या राष्ट्रीय सरकारकडून शिकस्तीचे प्रयत्न होत आहेत. अहमदनगर जिल्ह्यांतील सहकारी पद्धतीवर चालू झालेला हा दुसरा साखर कारखाना असून उत्तरोत्तर तो प्रगतीपथावर असल्याचें खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

| गळिताचा हंगाम | एकूण कारखाना चालू दिवस | हंगामांत गळितास आलेला ऊंस टन | हंगामांतील साखर उत्पादन पोतीं | हंगामांतील सरासरी उतारा |
|---|---|---|---|---|
| प्रथम १९५५–५६ | ९९ | ५२२३४ | ५१३९२ | १०·०१३ |
| द्वितीय १९५६–५७ | २०५ | १५२५८८ | १७०२४० | ११·२८७ |
| तृतीय १९५७–५८ | २०५ | १७७१०२ | २०१३०१ | ११·३७५ |

कारखान्याचे चेअरमन श्री. व्ही. पी. वर्दे व मॅनेजिंग डायरेक्टर मेजर गुलाबराव देशमुख यांचे नेतृत्वाखाली कारखान्याची थोडक्याच अवधींत प्रशंसनीय अशी प्रगति झाली असून कारखान्याचे सभासद, डायरेक्टर्स अधिकारी वर्ग, कामगार वर्ग, कंत्राटदार, गाडीवान या सर्वांचे संबंध स्नेहाचे, बंधुभावाचे व एकदिलाचे आहेत. त्यामुळें कारखान्यामध्यें सर्वत्र कामांत शिस्त व सूत्रबद्धता दिसून येतें व यांतच कारखान्याच्या उत्तरोत्तर होणाऱ्या उत्कर्षाचें मर्म सामावलेलें आहे.

वा. के. मोहोळकर
लेबर अँन्ड वेलफेअर ऑफिसर.
दि कोपरगांव सहकारी साखर कारखाना लि.
कोपरगांव.

---

### पुरुषांपेक्षा स्त्रियांत ५३% जास्त प्रामाणिकपणा

फिनलंडमध्यें २५२ गिऱ्हाइकांना मुद्दामच योजून जास्त मोड देण्यांत आली. ही त्यांना मोजून दिली, त्यामुळें प्रत्येक गिऱ्हाइकाला किती मोड मिळाली, हें नीट समजलें होतें. जास्त दिलेल्या मोडीची सुमारें रक्कम आठ आण्यांपासून आठ रुपयांपर्यंत होती. पुरुषांपैकी ६०·९% गिऱ्हाइकांनीं कॅशिअरचें ह्या चुकीकडे लक्ष वेधून जादा मोड परत केली, पण फक्त ५५·४% स्त्रियांनीं मोड परत केली; बाकीच्यांनीं ओठ मिटून घेऊन पाय काढतां घेतला. ही चाचणी "नागरिकांची नीति सुधारण्यासाठी" स्थापलेल्या एका संस्थेनें घेतली. फिनलंडमधील प्रत्येक चार जणांत एक अप्रामाणिक आहे, असा त्या चाचणीचा निष्कर्ष निघाला.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.